**प्रेस नोट** **दि.१४/०३/२०१९**

## कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे शहर

### तांत्रिक विश्लेषणाआधारे पोलीसांनी लावला गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध

श्रीकांत जाधव, रा.यशवंतनगर, नवी खडकी, पुणे यांचा दि.२८/०७/२०१८ रोजी सॅमसंग गॅलेक्सी जे-७ मोबाईल १८ हजार रूपये किंमतीचा सेंट मीरा कॉलेज, कोरेगाव पार्क येथे पडून गहाळ झाल्याने, त्याबाबत त्यांनी ऑनलाईन प्रॉपर्टी मिसींग एल आर नं.१५२०१९२०१८ अन्वये, दि.२८/०७/२०१८ रोजी नोंद केली.

नमूद सॅमसंग गॅलेक्सी जे-७ मोबाईल संदर्भात दिलेल्या मिसींगची माहिती पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन, पुणे यांनी घेवून सदर मोबाईलचा आयएमईआय नंबर ट्रेसिंगला लावला. सदर तांत्रिक विश्लेषणावरून सदरचा मोबाईल हा इसम नामे मुस्ताक आरफिन अन्सारी, रा.ईशान्य मॉलजवळ, येरवडा, पुणे यांचे ताब्यात असल्याचे समजून आल्याने, त्यांचेशी संपर्क करून मोबाईल ताब्यात घेवून, तो श्रीकांत जाधव यांना परत केलेला आहे. अशा प्रकारे श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस ठाणे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी विनोद साळुंखे यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईल शोधून काढलेला आहे. मोबाईल परत मिळाल्याने तक्रारदार यांनी पोलीसांचे कौतूक करून आभार मानले.

(मदन बहाद्दरपुरे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे